# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक[02482]-223132 टोल फ्री क्रमांक1077फॅक्स क्रमांक(02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com , jalnaddmo@gmail.com Website:- www.jalna.nic.in , http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांकः १९/०३/२०२०.

**प्रति,**
**सर्व विभाग प्रमुख,**
**शासकीय कार्यालय, जिल्हा जालना.**

**विषय : करोना विषाणूचे प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील बैठकांवर निर्बंध आणण्याबाबत.**

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक-२०२०/प्र.क्र.३७/१८ (र.व का.) दिनांक १९ मार्च २०२०.

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भिय शासन परिपत्रकानुसार **करोना विषाणूचे प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील बैठकांवर निर्बंध आणण्याबाबत** मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत या सोबत अंमलबजावणीस्तव देण्यात येत आहे. तरी त्यानुसार जालना जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालयीन विभाग प्रमुख यांनी अंमलबजावणी करावी.

**सोबत : संदर्भीय परिपत्रकाची प्रत.**

Raut

(रविंद्र बिनवडे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना

**कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयांतील बैठकांवर निर्बंध आणण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०२०/ प्र. क्र.३७/१८ (र. व का.)**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २०२०.

**शासन परिपत्रक :**

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूंचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. या प्रतिबंधात्मक योजनेचा भाग म्हणून कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये, याद्दष्टीने शासकीय बैठकांवर निर्बंध आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. कोरोना विषाणूंच्या प्रादुर्भाव संपूर्णपणे नियंत्रणामध्ये येईपर्यंतच्या कालावधीसाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये यांनी बैठकांचे शक्यतो आयोजन करू नये. हा संसर्गजन्य आजार असल्याने बैठका आयोजित करणे अनिवार्य असेल तरच त्या आयोजित कराव्यात. तसेच विषाणूंचा संसर्ग टाळण्याच्या द्दष्टीने बैठकीस आमंत्रित अधिकारी / कर्मचारी यांची बैठक व्यवस्था करताना त्यांचा एकमेकांशी संपर्क होणार नाही, अशा प्रकारे एक आसन सोडून पुरेसे अंतर ठेवण्याची दक्षता घ्यावी.

३. तरी सर्व मंत्रालयीन विभाग तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयांनी सदर सूचनांनुसार अंमलबजावणी करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२००३१९१७२००५७४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Bhaskar Gaikwad

Digitally signed by Rajesh Bhaskar Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5b1378a498cdff3fdd9ea5370b71fae3eca97e85924d0e44358ade5f0221f9a, serialNumber=26e171ec96c63f6333217d12fb6da1c5a800ce18a7a6d59abf19b8ed3f02a91, cn=Rajesh Bhaskar Gaikwad
Date: 2020.03.19 17:23:08 +05'30'

**( रा. भा. गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,